# राशिभविष्य - ऑगस्ट, २०११.

**दादा दामले (dadadamle@hotmail.com)**

==========================================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात सर्व प्रकारच्या दुखापतीपासून जपावे. विशेष करून दिनांक २-३-४ या तीन दिवशी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, आर्किटेक्चर, लोखंडी सामान व्यापारी, बागाईत शेती आदि नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करा. गडबड, घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब, नुकसान अशापैकी अनुभव येण्याची शक्यता आहे. सरळ मार्गानेच सर्व आर्थिक व्यवहार करा. शासकीय निम-शासकीय नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मार्ग अवलंबणे धोक्याचे आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत काहीही कारणाने अडथळे येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या मंडळींना संततिविषयक समास्या त्रस्त करतील. या राशीच्या लेखकवर्गास नवे लेखन पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यास काळ अनुकुल होईल. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने या राशीच्या साहित्य, कला क्षेत्रातील मंडळींना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास काळ अनुकुल होईल. महिन्याचा पूर्वार्ध कौटुंबिक सुखाचे दृष्टीने थोडा मनस्तापदायकच असेल. उत्तरार्धात विविध कारणांनी मन अस्वस्थ राहील. जपा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने एकूण परिस्थिती अस्थिर असल्याचाच अनुभव येईल. पण मानसिक रोग तज्द्न्य, द्रव पदार्थ व्यावारी, यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मित्रांशी काहीही कारणाने भांडणे, वाद होण्याची शक्यता आहे. जपा. अध्यात्म, उपासना आदिमध्ये व सामाजिक कार्यात रस असणारांना प्रगती व समाधान या दृष्टीने काळ अनुकुल होईल. वैवाहिक जीवनातील सुख व संततिसुख यांत काही ना काही कारणाने बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना अस्वस्थ, मन, आळस वा नैराश्य अशापैकी कारणांनी मनापासून अध्ययन करणे जमणार नाही. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने पूर्णपणे अनुकुल असून या राशीच्या काहींना बढती, उच्च पद असे काही प्राप्त होईलसे दिसते. पण मंगळामुळे अविचाराने खर्च होणे, अनपेक्षित आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागणे, अर्थप्राप्तीत अनिश्चितता; पण देणे मात्र द्यावेच लागेल. सामान्य नोकरी असणारांना आवश्यक अर्थप्राप्तीसाठी कठोर मेहनत करावी लागेल. या राशीच्या काही मंडळींची या काळात बुद्धी विकृत होण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. अपघात भय आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे एकूण ग्रहमान संमिश्र प्रकारचे आहे असेच म्हणावे लागते. केवळ शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळेच काळ काही प्रमाणात सुसह्य होईल. मंगळामुळे श्रम, दगदग, शरीरपीडा सहन करावी लागेल. त्यात या राशीच्या मंडळींच्या हट्टी, हेकट स्वभावाची भर पडून अधिकच मनस्ताप सहन करावा लगेल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायात प्रतिकुल परिस्थितीच असण्याची शक्यता दिसते. मात्र उत्तरार्धात शास्त्रीय संशोधन क्षेत्र, चिकित्सक बौद्धिक क्षेत्र, वकिली अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना व शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काहींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा प्राप्त होण्याच**(२)**

शक्यता आहे. शुक्रामुळे महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखसमाधान मिळेल; पण शनिमुळे राहत्या जागेचा प्रश्न, स्थावर वाद, न पटवून घेणे अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे. अध्यात्म, उपासना अशा गोष्टीत रस असणारांना अध्यात्मिक साधनेत व उपासनेत सात्विक सुखसमाधान लाभेल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-बुध हे तीन दादा ग्रह अतिशय प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, जुनी दबलेली प्रकरणे पुन्हा उकरली जाणे, अविचाराने खर्च होणे, हाती घेतलेल्या कार्यात अडथळे निर्माण होणे, असह्य मनस्तापामुळे थकवा येणे, रक्तदाब वाढणे, हृदयविकार बळावणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. परंतु शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक व वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल. शनि-गुरुच्या अनुकुलतेने शिक्षणक्षेत्र, चिकित्सक बौद्धिक क्षेत्र, वकिली, अकौन्टन्सी, शास्त्रीय संशोधन असे नोकरी-व्यवसायाचे क्षेत्र असणारांना काळ अनुकुल, लाभदायक व प्रगतिकारक होईल. कमिशन, दलालीसारखे व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण काहीही कारणाने संततिसुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. दगदग करू नये. जलभय, विषभय आहे. जपा. या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या विद्यार्थांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येण्याची शक्यता आहे. या राशीच्या काही युवकयुवतींना नवी नोकरी मिळू शकेल; तर काहींना नवे कार्यक्षेत्र प्राप्त होईल. या राशीच्या काही मंडळींना भावंडविषयक समस्येबाबत चिता उत्पन्न होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे ग्रहमान शारीरिक-मानसिक अनारोग्यकारकच असणार आहे. रवि, बुध, हर्षल, नेपच्यून,राहू-केतु आदि ग्रह प्रतिकुल व मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. मंगळ नोकरी-व्यवसायात शारीरिक कष्ट-परिश्रम करावयास लावील; पण आर्थिक चिंता करावयास लावणार नाही. उलट या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभही देऊ शकेल. तसेच हा मंगळ रविमुळे मनासारखे काही घडत नसल्याने असह्य मनस्ताप सहन करावा लागेल व त्यामुळेच शारीरिक-मानसिक अनारोग्य होण्याची शक्यता दिसते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन शांत व संयमित राखण्याचा प्रयत्न करावा. धनस्थानी असलेल्या शनिमुळे कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता असते. तसेच हा शनि आर्थिक संकटेही आणतो. म्हणून आर्थिक व्यवहार विचारपूर्वकच करा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. राहू-केतु कौटुंबिक जीवनात कटकटी व नोकरीत विरोधी परिस्थिती निर्माण करतात. नेपच्यून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्मितो; तर हर्षल अपघातभय असल्याचे सुचवतो. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळेच मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. अद्याप साडेतीन महिन्यांचा शनिदेवांच्या साडेसातीचा काळ बाकी आहे. सबब मारुतीउपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात अत्यंत प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. सतत मनाविरुद्ध घटना घडत असल्यामुळे मन अस्वस्थ होईल व गहरे नैराश्य येणे संभवते. मंगळ

ग्रहामुळे नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल व स्वतंत्र व्यावसायिकांना खळबळजनक घटनांना तोंड द्यावे लागेल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या शनिमुळे स्वत:चे शारीरिक अनारोग्य व मानसिक मनस्ताप तसेच जीवनसाथीचे अनारोग्याचा परिणाम सहन करावा लागेल. कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे काही कारणाने स्थलांतर झाल्यामुळेही मन बेचैन होईल. नेपच्यूनमुळे या राशीच्या काहींना उगीचच आजारभवना व काल्पनिक चिंतांचा त्रास होईल. हर्षलमुळे दांपत्यजीवनात मतभेद, वाद, भांडणे होतील. जपा. कोर्टप्रकरणे असतील तर विरुद्ध निकाल लागण्याचीच शक्यता आहे. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर गैरसमजाने वा संशयाने भागीदारीत अडथळे निर्माण होतील. जपा. राहूमुळे भावंडसुखात बाधा येणे संभवते; तर केतुमुळे संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे मन प्रसन्न होईल. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभयोग आहे , अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभे होऊ शकेल.
**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व भावनाशील झाले असले पाहिजे. त्यामुळे थोडेसे जरी काही मनाविरुद्ध घडले तर लगेच अस्वस्थता येत असण्याची शक्यता दिसते. पण गूढशास्त्राची आवड असेल, अध्यात्मात रुचि असेल तर उपासनेद्वारा मन:शक्ती प्राप्त करणे शक्य होईल. या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने काळ अतिशय अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. कलाक्षेत्रातील मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय व शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धातच अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान व आनंद लाभेल. असे सर्व असले तरी शनिदेवांची अवकृपा आहे; साडेसातीचा काळ आहे; त्यामुळे सर्व आचरण व सर्व आर्थिक व्यवहार, एकूण सर्वच बाह्य जगाशी व्यवहार अत्यंत सावधानतेने होणे आवश्यक आहे. शरीर-मनाचे आरोग्य उत्तम राखण्याचा प्रयत्न करा. विशेष करून दिनांक ५-६ या दोन दिवशी अधिक मनस्ताप होणे संभवते. अपघातापासून जपा. कोर्टप्रकरणे असतील तर सामोपचाराने मिटविण्याचा प्रयत्न करा. या राशीच्या धनस्थानी असलेला राहू आर्थिक संकटे व कौटुंबिक जीवनात कलह निर्माण करण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल व विपरीत परिस्थितीला टक्कर देण्याची क्षमता प्राप्त होईल.
**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ सर्व प्रकारच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिकुल असाच असणार आहे. घरीदारी सर्व ठिकाणी मनाविरुद्ध घटनाच घडत असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे या राशीच्या काहींना वातविकारांचा तर काहींना उष्णताविकारांचा असह्य त्रास सहन करावा लागेलसे दिसते. अपघातभय, जलभय व वीजभय आहे. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. उत्तरार्धात बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्या. शनि फ़ारसा मनस्ताप देणारा नसला तरी संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. गुरु ग्रह सर्व प्रकारचे आरोग्य सीमेबाहेर बिघडू न देण्याचा प्रयत्न करील; व महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायास अनुकुल व पूरक असा असेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शनि वकिली, अकौण्टन्सी सारख्या चिकित्सक बौद्धिक व्यवसायास तर हर्षल शास्त्रीय संशोधनात्मक. कलात्मक व साहित्य क्षेत्रात रुचि असणारांना

अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अकारण गैरसमज, घोटाळे, मतभेद असे काही घडून कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-हर्षल हे तीन ग्रह पूर्णपणे आणि विशेष करून दिनांक २-३-४, ९-१० व ३०-३१ या सात दिवशी शनि ग्रह प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडणे, नोकरीत वरिष्ठांशी मतभेद होणे, जीवनसाथी, मुले यांच्या आरोग्यविषयक समस्यांना तोंड देणे, घरातील वडील व्यक्तींशी मतभेद होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे असह्य मनस्ताप होऊन एकदम गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. अशा परिस्थितीत रशिस्वामी गुरु व शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह अतिशय अनुकुल असल्यामुळे मनोनुकुल घटना घडतील व काळ सुसह्य होईल. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारी व्यापार, व्यवसाय असेल त्यांनी भागीदारीत संशय, गैरसमज आदि कारणांनी बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. दांपत्यजीवनात कोणी एकाने नमते घ्यावे. मन शांत, स्वस्थ व प्रसन्न राखण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे बरेचसे अनुकुल असेच घडेल. कौटुंबिक सुखशांति जपण्यास राशिस्वामी गुरु समर्थ आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे. स्नेहसंबंध वाढतील. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. शुक्रामुळे विविध प्रकारचे लाभ होतील. अध्यात्मात विशेष रुचि असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांति लाभेल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ सर्व प्रकारच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रतिकुल असणार आहेत. गुरु ग्रह कौटुंबिक व गृहसौख्याचे दृष्टीने अनुकुल होईल. काहीजण स्थावर खरेदी करतील; तर काहीजण स्थावराची विक्री करतील. असे असले तरी नातेवाईक मंडळींकडून त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सर्वांनाच विविध प्रकारे लाभदायक होईल. हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक असा सिद्ध होईल; तर या राशीच्या काही भग्यवंतांना परदेशगनाची संधी देईल. या राशीच्या धनस्थानी नेपच्यून असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक व गडबड-घोटाळे होणार नाहीत याची काळजी घेऊनच करावेत. तरीही आर्थिक येणे येण्यात विलंब होण्याची शक्यता दिसते. राहू नोकरी-व्यवसायास अनुकुल असला व सहज वाममार्ग धन देऊ शकत असला, तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. शिवाय हा राहू संततिसुखाचे दृष्टीनेही प्रतिकुलच असेल. केतुमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात काहीही कारणाने अडथळे येणे संभवते. महिन्याचा उत्तरार्ध यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, औषधी व्यवसाय असणारांना अधिक आर्थिक लाभ देणारा असाच सिद्ध होईल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात काही बाबतीत अनुकुल तर काही बाबतीत प्रतिकुल अशी संमिश्र फ़ळे व अनुभव मिळण्याची शक्यता आहे. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व शीघ्र मानसिक संवेदना होणारे असे झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनासारखे थोडेही काही घडले नाही तर लगेच नैराश्य येत असावे. त्यात धनस्थानी असलेल्या

हर्षलमुळे स्वभाव विक्षिप्त होण्याचीही शक्यता दिसते. अशा परिस्थितीत जिभेला लगाम घालूनच आचरण करा. या राशीची लहान मुले सध्या अतिशय हूड व व्रात्य असण्याची शक्यता दिसते. पण हा हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना अनुकुल होईल. कौटुंबिक जीवनात कोणाशी पटवून घेणे शक्य होणार नाही. मंगळ संततिसुखाचे दृष्टीने तापदायक असाच असेल. मुले मनाविरुद्ध वागून मनस्ताप देतील. पण यांत्रिकतांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण घेत असणारांना प्रगतिकारक असाच असेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. रवि व राहू हे दोन ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना अनुकुल व लाभदायक होतील. पण उत्तरार्धात रवि ग्रह अनारोग्यकारक व दाम्पत्यजीवनात कटकटी निर्माण करणारा असाच असेल. शुक्र कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखास प्रतिकुलच असेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यापारीवर्गास आर्थिक लाभ देणारा असाच सिद्ध होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी, मानी, कसलेही दडपण वा इतरांचा सल्ला सहन न होणारे असे झाले असण्याची दाट शक्यता आहे. या उलट मन मात्र अतिशय व्यग्र व चिंतायुक्त आणि निराश असे झाले असण्याची शक्यता दिसते. पण स्वभावाला थोडी मुरड घातलीत तर नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने खूपच अनुकुल व लाभदायक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील व नोकरी-व्यवसायात उत्तम अर्थलाभ होईल. व्यवसायवाढही संभवते. थोडे आध्यात्मिक उपासनेकडे लक्ष दिलेत तर मन खंबीर व आत्मविश्वासपूर्ण असे होईल. नपेक्षा मंगळामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमजाने होणाऱ्या भांडणतंटयांना तोंड देणे कसे शक्य होईल ? काहींना राहत्या जागेच्या वा स्थावरसंबंधीच्या कटकटींना सामोरे जावे लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल होईल. विरोधक नमतील व सुखसमाधान लाभेल. पण पूर्वार्धात मात्र तो सर्वच दृष्टीने प्रतिकुल असेल. विशेष करून तो अनारोग्यकारक व मन अस्वस्थ ठेवणारा असाच सिद्ध होईल. शनिमुळे जीवनसाथीच्या आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागेल व स्वत:स कुसंगतीपासून त्रास होईल. त्यामुळे स्वत:च्या आरोग्यावरही अनिष्ट परिणाम होऊ शकेल. जपा.

=====00000======